MHLA050006602018

विशेष दिवाणी दावा क्र. १३/२०१८
विजया वि. भागवत वगैरे

**आदेश नि.क्र. ६० वर**

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादींनी मृत्यूपत्राची प्रत दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारून त्या प्रतीस निशाणी क्रमांक देण्यात यावे अशी मागणी केली आहे.

२) सदर अर्जावर युक्तिवाद ऐकला. अर्जातील कथने व युक्तिवाद असा की, वादीचे वडील मयत नागनाथ तुकराम बिलापट्टे यांनी दिनांक ७-८-२०१८ रोजी वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या हक्कात नोंदणीकृत मृत्यूपत्र क्र. २७६४/२०१८ लिहून ठेवले. मृत्यूपत्राची मुळ प्रत प्रतिवादींकडे असून त्यांनी ती या कामी जाणूनबुजून दाखल केलेली नाही. म्हणून वादींनी मृत्यूपत्राची सत्यप्रत दाखल केलेली आहे. मृत्यूपत्राबाबतचे कथन वादींनी सरतपासात केले आहे त्यामुळे त्यास निशाणी देण्यात यावा.

३) वादीच्या कथनाप्रमाणे मुळ मृत्यूपत्र प्रतिवादींच्या ताब्यात आहे. त्यामुळे वादींनी मृत्यूपत्राची सत्यप्रत दाखल केलेली आहे. जर मुळ मृत्यूपत्र प्रतिवादींच्या ताब्यात असेल तर भारतीय पुरावा कायदा कलम ६५ प्रमाणे मुळ मृत्यूपत्र दाखल करण्यासाठी वादींनी प्रतिवादींना नोटीस देणे आवश्यक होते. त्यानंतरही जर प्रतिवादींनी मुळ मृत्यूपत्र दाखल केले नाही तर वादींना त्याबाबतचा दुय्यम पुरावा दाखल करण्याची संधी प्राप्त होईल. परंतु अशी नोटीस वादींनी प्रतिवादींना दिल्याबाबत अर्जात काहीही कथन नाही व त्याची प्रतही दाखल केलेली नाही. त्यामुळे वादींना मृत्यूपत्राची प्रत दुय्यम पुरावा म्हणून दाखल करता येणार नाही. त्याचप्रमाणे मृत्यूपत्र नोंदणीकृत असेल तरीही त्यातील मजकुर, मृत्यूपत्राचा अस्सलपणा त्यावरील साक्षीदारांच्या साक्षीद्वारे

सिध्द करणे आवश्यक आहे व त्यानंतरच ते पुरावा म्हणून वाचता येईल. म्हणून सद्यस्थीतीला सदरचे मृत्यूपत्र दुय्यम पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही व त्यास निशाणी क्रमांक देता येणार नाही. सदरचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

अर्ज नामंजूर केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.11.29 15:47:05 +0530

(प्र. अ. सवदीकर),

दिनांक २९/११/२०२२. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.